# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 17 October 2026

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ दुपारी १.०० वा.

****

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि चीनला दिलासा देत रशियाकडून तेल आणि गॅस खरेदी करणाऱ्या देशांवर लावण्यात येणाऱ्या अतिरिक्त शुल्क आणि निर्बंधांमध्ये सूट दिली आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प म्हणाले की, हा निर्णय अमेरिकेच्या राष्ट्रीय हिताचा विचार करून घेण्यात आला आहे. अतिरिक्त शुल्क लावण्याच्या निर्णयावर त्यांनी १८ सप्टेंबर रोजी स्वाक्षरी केली होती. या कायद्यानुसार रशियाकडून तेल आणि गॅस खरेदी करणाऱ्या प्रमुख देशांवर १०० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त शुल्क लावण्याची तरतूद होती. याशिवाय, रशियातून आयात होणाऱ्या वस्तूंवर ५०० टक्क्यांपर्यंत शुल्क लागू शकत होते. मात्र, ट्रम्प यांनी सध्या काही शुल्क लागू करण्यापासून सूट दिली आहे. दरम्यान, अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांचा भारत दौरा देखील प्रस्तावित आहे. ते २० ऑक्टोबर रोजी मुंबईत परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांची भेट घेऊ शकतात. त्यानंतर ते गुजरातमधील जामनगर रिफायनरी परिसराला भेट देण्याचीही शक्यता आहे. हा निर्णय अशावेळी आला आहे, जेव्हा रशिया आणि अमेरिका यांच्यात डिझेल पुरवठ्याबाबत कराराची शक्यता आहे. तर, नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांपूर्वी अमेरिकेत डिझेलच्या किमती वाढत आहेत.

****

सण-उत्सवांच्या काळात साखरेचा पुरवठा पुरेसा व्हावा यासाठी, ऑक्टोबर महिन्यात उत्पादित झालेली साखर, नियमित मासिक कोट्याव्यतिरिक्त, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या दोन महिन्यात विकण्याची परवानगी केंद्र सरकारनं साखर कारखान्यांना दिली आहे. केंद्रीय अन्न मंत्रालयानं आज सर्व साखर कारखान्यांना

तसे निर्देश दिले आहेत. ही विक्री संबंधित महिन्यांसाठी निश्चित केलेल्या नियमित मासिक विक्री कोट्याव्यतिरिक्त असेल, असं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

****

अकोला शहर पाणीपुरवठा योजनेसाठी काटेपूर्णा प्रकल्पातून ९ पूर्णांक ०३ दशलक्ष घनमीटर आणि मोर्णा मध्यम प्रकल्पातून १५ दशलक्ष घनमीटर पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्यात आलं असून त्यानुसार दोन्ही धरणांतील एकूण आरक्षित २४ पूर्णांक ०३ दशलक्ष घनमीटर पाण्यावर अकोला शहराची तहान भागवली जाणार आहे. उपलब्ध पाणीसाठ्याचा काटेकोर वापर करून बिगर सिंचनासाठी आवश्यक पाणी आरक्षित केल्यानंतर उर्वरित पाण्यावर रब्बी हंगाम २०२६-२७ साठी सिंचनाचे नियोजन करण्याचे निर्देशही अकोला जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

****

यंदाच्या पावसाच्या अभावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी महावितरण ने थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन एक अभिनव आणि दिलासादायक उपक्रम हाती घेतला आहे. महावितरण चे मुख्यअभियंता दत्तात्रय बनसोडे यांनी बुलडाणा जिल्ह्यात शेतामध्ये जाऊन शेतकऱ्यांच्या वीजविषयक अडचणी जाणून घेतल्या. विहिरीत पाणी असूनही वीज समस्येमुळे ते पिकांना देता येत नसल्याच्या तक्रारीवर त्यांनी ‘कॅपॅसिटर’ बसवण्याचा उपाय शोधला असून, मोटारींवर कॅपॅसिटर लावण्याचं थेट प्रात्यक्षिक करून दाखवलं.

****

आज ‘आंतरराष्ट्रीय गरिबी निर्मूलन दिन’ आहे. १७ ऑक्टोबर १९८७ रोजी, पॅरिसमधील ‘ट्रोकाडेरो’ इथे – ज्या ठिकाणी १९४८ मध्ये एक लाखांहून अधिक लोकांच्या उपस्थितीत, ‘मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा’ स्वाक्षरित झाला होता त्यावेळची आठवण म्हणून हा दिवस पाळण्यात येतो.

****

युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने राष्ट्रीय क्रीडा महासंघांना सहाय्य देण्याच्या सुधारित योजनेसाठी परिचालन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. यामध्ये योजनेच्या विविध घटकांसाठी सहाय्य देण्याचे सुधारित निकष समाविष्ट आहेत. सरकारने २०२६-२७ ते २०३०-३१ या कालावधीसाठी सुमारे ७ हजार ४०० कोटी रुपयांच्या एकूण खर्चासह ही योजना सुरू ठेवण्यास मंजुरी दिली आहे.

ही योजना ऑलिम्पिक स्पर्धा, आशियाई स्पर्धा, राष्ट्रकुल स्पर्धा, पॅरालिम्पिक स्पर्धा आणि जागतिक अजिंक्यपद स्पर्धा यांसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या तयारीसाठी भारताच्या खेळाडूंना सहाय्य पुरवणारी प्रमुख यंत्रणा आहे.

****

भारताच्या महिला क्रिकेट संघाने काल झिम्बाब्वेचा ४ गडी राखून पराभव केला. रायपूर इथे झालेल्या सामन्यात झिंबाब्वेने प्रथम फलंदाजी करत पाच बाद ११४ धावा केल्या. भारताने हे लक्ष्य ६ गडी गमावत १५ षटकं आणि ४ चेंडूत साध्य केलं. मालिकेत दुसरा आणि तिसरा सामना अनुक्रमे १८ आणि २० ऑक्टोबरला होणार आहे.

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातल्या पाच सामन्यांच्या टी-ट्वेंटी मालिकेतला शेवटचा निर्णायक सामना आज बेंगळुरूमधल्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर होणार आहे. हा सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल. या मालिकेत प्रत्येकी २ सामने जिंकून दोन्ही संघ बरोबरीत आहेत.

****